## सल्ला----------!

कुणी सांगावे कुणाला,
कुणी ऐकावे कुणाला.
वृध्दत्व आहे, इथे गंजलेले,
सल्ला तयांचा, हवा इथे कुणाला.
बाल्य वाढे, इथे कोंडवाडी,
आसरा मायेचा, हवा इथे कुणाला.
शृंगार, सारे इथे यंत्रलेले,
गंध मोगरीचा, हवा इथे कुणाला
जगणेच सारे, इथे वांझोटलेले
आनंद मरणातला, हवा इथे कुणाला.
नका बोल लावू, तुम्ही इथे कुणाला,
ऐकण्यास तुमचे, फुरसत इथे कुणाला.

**डॉ. विनोद अडबे**